शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८वी

विषय – मराठी (प्रथम भाषा)

घटक 3 – कार्यात्मक व्याकरण

भारांश – 44%   प्रश्नसंख्या – 11   एकूण गुण 22

3.3 शब्दांच्या जाती –

अ) विकारी शब्द – लिंग, वचन किंवा विभक्ती यांमुळे ज्या शब्दांच्या रुपात बदल होतो त्याला विकारी शब्द म्हणतात.

1. नाम – प्रत्यक्षात असणाऱ्या किंवा कल्पनेने जाणलेल्या वस्तूंना किंवा त्यांच्या गुणधर्मांना दिलेली नावे.

1) सामान्यनाम – एकाच जातीच्या पदार्थाला समान गुणधर्मामुळे त्या वस्तूला मिळालेले नाव. उदा. कळप, राक्षस, नदी.
2) विशेषनाम – या नामाने जातीतील एका विशिष्ट व्यक्तीचा, प्राण्याचा, वस्तूचा बोध होतो. उदा. नर्मदा, हिमालय, सुजय, मुंबई.
3) भाववाचक नाम/ धर्मवाचक नाम – या नामाने प्राणी किंवा वस्तू यांमध्ये असलेल्या गुण, धर्म किंवा भाव यांचा बोध होतो. उदा. नवलाई, सौंदर्य, शांतता.
4) धातुसाधित नाम – धातूंना प्रत्यय लावून तयार झालेल्या नामे. उदा. पोहणे, हसणे, बोलणे.

2. सर्वनाम – नामाच्या ऐवजी येणारा शब्द .

1) पुरुषवाचक सर्वनाम –

प्रथम पुरुषवाचक – बोलणारा स्वतःचा उल्लेख करताना जी सर्वनामे वापरतो ती प्रथम पुरुषवाचक सर्वनामे.

मी, आम्ही, आपण.

द्वितीय पुरुषवाचक – ज्याच्याशी बोलायचे त्याचा उल्लेख करताना जी सर्वनामे आपण वापरतो ती द्वितीय पुरुषवाचक सर्वनामे – तू, तुम्ही.

तृतीय पुरुषवाचक – जांच्याविषयी बोलायचे त्या वस्तू किंवा व्यक्ती यांचा उल्लेख करताना जी सर्वनामे वापरतो ती तृतीय पुरुषवाचक सर्वनामे – तो, ती, ते,त्या.

2) दर्शक सर्वनामे – जवळची किंवा दूरची वस्तू दाखवण्यासाठी – हा, ही, हे, ते .

3) संबंधी सर्वनामे – वाक्यात पुढे येणाऱ्या दर्शक सर्वनामाशी संबंध दाखवणारी - जो,जी, जे.

4) प्रश्नार्थक सर्वनामे – या सर्वनामाचा उपयोग प्रश्न विचारण्यासाठी होतो. कोण, कोणास, काय.

5) सामान्य किंवा अनिश्चित सर्वनामे – कोण, काय ही सर्वनामे वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी न येता ती कोणत्या नामांबद्दल आली आहेत ते सांगता येत नाही ती अनिश्चित सर्वनामे होत.

उदा. कोणी कोणास हसू नये.

6)आत्मवाचक सर्वनामे – या सर्वनामाचा अर्थ स्वतः असा होतो.

उदा. आपण, स्वत:

3. विशेषण – नामाबद्दल विशेष माहिती सांगून नामाची व्याप्ती मर्यादित करणारा शब्द.

1) गुणविशेषण – नामाचा गुण किंवा विशेष दाखविणारा शब्द.

उदा. <u>शूर</u> सरदार, <u>शुभ्र</u> ससा.

2) संख्या विशेषण – नामाची संख्या दाखविणारा शब्द.

उदा. <u>दोन्ही</u> भाऊ, <u>साठ</u> रुपये, <u>चौपट</u> मुले,काही पक्षी.

3) सार्वनामिक विशेषण – सर्वनामापासून बनलेली विशेषणे.

उदा. <u>हा</u> मनुष्य, <u>तो</u> पक्षी.

4. क्रियापद – वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा क्रियावाचक शब्द.

मुख्य प्रकार -

1) सकर्मक क्रियापद – क्रियापदाचा अर्थ पूर्ण होण्यास कर्माची जरुरी असते.

उदा. मधुरा लाडू खाते.

2) अकर्मक क्रियापद - क्रियापदाचा अर्थ पूर्ण होण्यास कर्माची जरुरी नसते.

उदा. आज भाऊबीज आहे.

इतर प्रकार –

संयुक्त व सहायक क्रियापद – धातुसाधित व सहायक क्रियापद यांच्या संयोगाने तयार झालेल्या क्रियापदाला संयुक्त क्रियापद म्हणतात.

क्रीडांगणावर मुले खेळू लागली.

खेळू + लागली = खेळू लागली

धातुसाधित + सहायक क्रियापद = संयुक्त क्रियापद

जेव्हा धातुसाधित व क्रियापद हे दोन्ही मिळून एकाच क्रियेचा बोध होतो, तेव्हा धातुसाधिताला मदत करणाऱ्या क्रियापदाला 'सहायक क्रियापद' असे म्हणतात.

बाळ, एवढा लाडू खाऊन टाक. (खाऊन टाक याचा अर्थ 'खा' असा आहे.)

प्रयोजक क्रियापदे – यामध्ये मूळ धातूच्या क्रियेचा कर्ता, ती क्रिया स्वतः करीत नसून, ती क्रिया तो दुसऱ्या कोणाला तरी करावयास लावीत आहे, असा अर्थ होतो.

उदा. आई त्या मुलाला हसवते.

शक्य क्रियापदे- जे साधित धातू कर्त्याला ती क्रिया करण्याची शक्यता किंवा सामर्थ्य आहे असे दाखवितात, त्यांना शक्य क्रियापद असे म्हणतात.

उदा. मला दररोज १० किलोमीटर चालवते.

धातूसाधिते (कृदन्ते) – जेव-णे, जेव-त, जेव-ता, जेव-ताना, जे-वून हे शब्द वाक्याचा अर्थ पूर्ण न करता ते वाक्यात नामे, विशेषणे किंवा क्रियाविशेषणे यांची कार्ये करतात. धातूपासून तयार झालेल्या अशा शब्दांना धातुसाधिते किंवा कृदन्ते असे म्हणतात.

क्रियापदाचा अर्थ –

1) स्वार्थ – क्रियापदावरून केवळ काळाचा बोध होतो.
   उदा. तो घरी गेला.
2) आज्ञार्थ - क्रियापदावरून आशीर्वाद, प्रार्थना, विनंती, उपदेश याचा बोध होतो.

उदा. सर्वांना सुखी ठेव.

3) विध्यर्थ - क्रियापदावरून कर्तव्य, शक्यता, योग्यता, इच्छा यांचा बोध होतो.

उदा. आता पाऊस थांबावा.

4) संकेतार्थ - क्रियापदावरून संकेताचा बोध होतो.

उदा. निमंत्रण आले, तर मी येईन.

सराव प्रश्न -

प्र. 1 ‘माझ्या खणखणीत आवाजाने आणि ठणठणीत भाषणाने सारी सभा मी दणाणूनच टाकली.’ या वाक्यात एकूण किती विशेषणे आली आहेत ? (२०२1)

1) चार 2) पाच 3) दोन 4) तीन

प्र. 2 पुढीलपैकी कोणत्या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ‘सामान्यनाम’ आहे? (2020)

1. वयाच्या बाराव्या वर्षी मी सातवी पास झालो.
2. मानवता हाच खरा धर्म आहे.
3. गावोगावी नारदमुनींची संख्या वाढलेली आहे.
4. ‘बोलावणे’ आल्याशियाय जाणार नाहीच!

प्र. 3 पुढील ओळीतील क्रियापदाचा अर्थ ओळखा. (2022)

‘सुखी सगळ्यांना ठेव देवराया,

मागणे हे अमुचे तुझ्या पाया.’

1) स्वार्थ 2) आज्ञार्थ 3) संकेतार्थ 4) विध्यर्थ

प्र. 4 मराठी भाषेतील मूळ सर्वनामे किती ? (2022)

1) नऊ 2) पाच 3) दहा 4) बारा

प्र. 5 घरटे विणणाऱ्या शिंपी पक्ष्याची चोच एखाद्या सुईसारखी पातळ आणि टोकदार असते.’ या वाक्यात आलेले धातुसाधित विशेषण कोणते ? (2024)

1) टोकदार 2) पातळ 3) सुईसारखी 4) विणणाऱ्या

प्र.6 ‘दुराग्रह ठाऊक असल्यामुळे मतभेदाचे अवघड विषय बहुधा आपण शिताफीने टाळतो.’ या वाक्यातील क्रियापदाचा अर्थ ओळखा. (2025)

1) विध्यर्थ 2) स्वार्थ 3) आज्ञार्थ 4) संकेतार्थ

प्र.7 ‘तो पक्षी सुंदर आवाज काढतो.’ या वाक्यात कोणत्या प्रकारची विशेषणे आली आहेत? (दोन पर्याय निवडा)

1)गुण विशेषण 2) संख्या विशेषण

3) सार्वनामिक विशेषण 4)धातुसाधित विशेषण

प्र.8 पुढीलपैकी कोणत्या नामास संख्या विशेषण लावले आहे ? दोन पर्याय निवडा. (2019)

1) दुहेरी रंग 2) कोणती इयत्ता 3) साहसी भाऊ 4) काही गट

प्र. 9 पर्यायांतून धर्मवाचक नाम नसलेला शब्द निवडा.

1) अद्भूत 2) नावीन्य 3) साहस 4) श्रीमंती

प्र. 10 'कोणतेही काम यशस्वी करण्यासाठी साहस दाखवायला हवे.' या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

1) सामन्यानाम 2) भाववाचक नाम 3) धातुसाधित नाम 4) विशेषनाम

प्र.11 खालील वाक्यातील सर्वनाम ओळखा.

घरी कोण आहे ?

1) निश्चित सर्वनाम 2) प्रश्नार्थक सर्वनाम
3) पुरुषवाचक सर्वनाम 4)सामान्य सर्वनाम

प्र.12 खाली दिलेल्या वाक्यातील विशेषणाचा प्रकार ओळखा.

मोठी मुले समजूतदार असतात.

1) गुण विशेषण 2) संख्या विशेषण
3) सार्वनामिक विशेषण 4)धातुसाधित विशेषण

उत्तरे –

1.	1	7.	2 व 3
2.	3	8.	1 व 4
3.	2	9.	1
4.	1	10.	2
5.	4	11.	2
6.	2	12.	1